# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.03.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या,**

**1. 'माय भारत बजेट क्वेस्ट 2026' स्पर्धेच्या राज्य विजेत्यांसोबत आज पंतप्रधानांचा संवाद**

**2. कोलकाता इथं पंतप्रधानांच्या हस्ते 18 हजार 700 कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन**

**3. एलपीजीवाहक 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' जहाजं भारताच्या दिशेने मार्गस्थ, एलपीजी सिलिंडर्सची केवळ गरज असेल तर आणि तेव्हाच नोंदणी करण्याचं नागरिकांना आवाहन आणि**

**४. दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे, विजांसह हलक्या पावसाची शक्यता**

आता सविस्तर बातम्या,

**मायभारत बजेट क्वेस्ट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून सुरू होणाऱ्या 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' स्पर्धेत सहभागी - राज्य आणि केंद्रशासित प्रदेश स्तरावरील विजेत्यांशी - संवाद साधणार आहेत. केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा करण्याकरता आणि 'विकसित भारत' घडवण्याबाबत दृष्टिकोन मांडण्याकरता युवकांना प्रोत्साहन देणारा हा महत्वाचा असा उपक्रम आहे.. यामधून 'युवा शक्ती'ला—प्रशासन आणि आर्थिक नियोजनामध्ये सामावून घेण्यावर भर देण्यात आला आहे. या उपक्रमाचा उद्देश तरुण 'अमृत पिढीची धोरण-निर्मितीमधील भूमिका बळकट करून २०२७ पर्यंत 'आत्मनिर्भर - विकसित भारत' घडवण्यात त्यांचं योगदान सुनिश्चित करणे असाही आहे. 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' मध्ये १२ लाखांहून अधिक तरुण सहभागी झाले आणि त्यांनी ४७ हजार निबंध सादर केले.

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल कोलकाता इथे १८ हजार ७०० कोटी रुपयांच्या विविध रस्ते, रेल्वे आणि बंदर प्रकल्पांचं उद्घाटन केलं , आणि विविध प्रकल्पांची पायाभरणी केली. या प्रकल्पांमुळे पश्चिम बंगाल आणि पूर्व भारतातील विकासाला नवी गती मिळेल असं पंतप्रधानांनी यावेळी बोलताना सांगितलं. . या प्रकल्पांमुळे मालवाहतुकीच्या कार्गो कामांना गती मिळेल, तसंच बंदरांची क्षमता वाढून व्यापाराला चालना देण्यासाठी नव्या सुविधा निर्माण होणार आहेत. पश्चिम बंगालमधील रेल्वे पायाभूत सुविधांचा वेगाने विस्तार करण्यासाठी केंद्र सरकारच्या प्रयत्नांवरही त्यांनी प्रकाश टाकला.

**जहाज**

भारताचा ध्वज असलेल्या 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' या दोन जहाजांनी काल 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' सुरक्षितपणे पार केली. बंदरं, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी काल नवी दिल्ली इथे आयोजित आंतर-मंत्रालयीन पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**अराघची**

सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण असलेली हॉर्मुझची सामुद्रधुनी आंतरराष्ट्रीय नौवहनासाठी खुली आणि कार्यरत आहे; मात्र अमेरिका आणि इस्रायलशी संबंधित जहाजांना या जलमार्गातून जाण्याची परवानगी नाही असं इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी म्हटलं आहे . अलीकडच्या लष्करी घडामोडींनंतर या प्रदेशात वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर एका अमेरिकन दूरचित्रवाणीला दिलेल्या मुलाखतीत, अरागची यांनी हा सागरी मार्ग पूर्णपणे बंद करण्यात आलेला नाही असं सांगितलं.

**ट्रम्प-होर्मूझ**

जागतिक तेल वाहतुकीसाठी महत्त्वाच्या होर्मूझ सामुद्रधुनी मार्गाच्या सुरक्षेसाठी, आपली जहाजं या मार्गाने पाठवण्याचा आग्रह अमेरिकेचे राष्ट्रपती डोनल्ड ट्रम्प यांनी संबंधित राष्ट्रांना केला आहे. ट्रूथ सोशल या समाजमाध्यमावरच्या संदेशात, ट्रम्प यांनी चीन, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया, ब्रिटन आणि इतर देशांना होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे जहाजं पाठवण्याचं आवाहन केलं आहे. दरम्यान अमेरिका इराणच्या किनारपट्टीवर हल्ले करून इराणच्या जहाजांना लक्ष्य करतच राहील असंही त्यांनी नमूद केलं आहे.

२८ फेब्रुवारीपासून, अमेरिका आणि इस्रायलने इराणवर मोठा - संयुक्त हल्ला - सुरू केला आहे आणि इराणच्या प्रत्युत्तरामुळे तो संपूर्ण आखाती प्रदेशात पसरला आहे. होर्मुझमध्ये सुरू असलेल्या इराणी हल्ल्यांमुळे कच्च्या तेलाच्या जागतिक पुरवठा साखळीतल्या महत्त्वाच्या असलेल्या या सामुद्रधुनीतील सागरी वाहतुकीवर परिणाम झाला आहे. पर्शियन आखात आणि ओमानच्या आखातामधील एक अरुंद जहाज मार्ग असलेली होर्मुझची सामुद्रधुनी इराणने रोखल्यानंतर जागतिक तेल आणि वायूच्या किमती वाढल्या आहेत. जागतिक तेल आणि द्रवरूप नैसर्गिक वायूची सुमारे २० टक्के वाहतूक या मार्गाने होते.

**अमेरिका-खार्गबेट**

(इराण)-तेहरानने शुक्रवारी झालेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून प्रत्युत्तर देण्याची शपथ घेतली असली तरीही - इराणच्या तेल निर्यातीचं महत्त्वाचं केंद्र असलेल्या इराणच्या खार्ग बेटावर - अमेरिका आणखी हल्ले करू शकते असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे . अमेरिकन वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांनी (इराण)-तेहरान संघर्ष संपवण्यासाठी करार करायला तयार दिसत असला तरी, अटी पुरेशा नाहीत- अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे खार्ग बेटाचा बहुतांश भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे - अमेरिका केवळ मनोरंजनासाठी, इराणच्या खार्ग बेटावर आणखी काही वेळा हल्ला करू शकते - असं सांगितलं .

हे राष्ट्रीय बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे...

**एलपीजी**

एलपीजी सिलिंडर्सची 'घाबरून जाऊन' आगाऊ नोंदणी करू नये, केवळ गरज असेल तर आणि तेव्हाच नोंदणी करावी - असं आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी देशातल्या नागरिकांना केलं आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार कोणत्याही किरकोळ विक्री केंद्रावर किंवा एलपीजी वितरक केंद्रावर इंधनाचा साठा संपलेला नाही; तसंच डिझेल आणि पेट्रोलचा - पुरेसा साठा - देशांत उपलब्ध आहे .

**श्रीलंका क्यूआर**

श्रीलंकेने आज सकाळी ६ वाजल्यापासून इंधन मागणाऱ्या सर्व वाहनांसाठी क्यूआर कोड नोंदणी प्रणाली अनिवार्य केल्याची घोषणा ऊर्जा मंत्रालयाने केली आहे. त्यामुळे आता वैध नोंदणीकृत क्यूआर कोडशिवाय इंधन दिलं जाणार नाही. मध्य पूर्वेतील चालू लष्करी तणावाशी संबंधित जागतिक इंधन पुरवठा मार्गांमध्ये व्यत्यय येत असताना हे पाऊल उचलण्यात आलं आहे.

**पाक हल्ला**

पाकिस्तानने - अफगाणिस्तानच्या हद्दीत केलेल्या हवाई हल्ल्यांचा भारताने तीव्र शब्दांत निषेध केला आहे; या हल्ल्यांमध्ये अनेक नागरिकांचा मृत्यू झाला असून नागरी पायाभूत सुविधांचंही मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. सार्वभौम अफगाणिस्तानच्या कल्पनेबाबत कायमच शत्रुत्वाची भूमिका घेणाऱ्या पाकिस्तानी व्यवस्थेकडून केलेली ही आक्रमकतेची आणखी एक कृती असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये, म्हटलं आहे.

**नेपाळ भाविकांचा मृत्यू**

नेपाळच्या गोरखा जिल्ह्यात काल संध्याकाळी एका बसला झालेल्या अपघातात किमान सात भारतीय भाविकांचा मृत्यू झाला. मनाकामना मंदिरात दर्शन घेऊन परतत असताना हा अपघात घडला. 'शहीद लखन' ग्रामीण नगरपालिकेच्या 'कांतर' भागात, तीव्र उतारावर घसरून ही इलेक्ट्रिक मायक्रो-बस एका दरीत कोसळल्यामुळे या भाविकांचा मृत्यू झाला. या मायक्रो-बसमध्ये 12 पेक्षा जास्त प्रवासी होते.

**BCCI**

भारतीय क्रिकेटमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींचा आणि क्रिकेटपटूच्या कामगिरीचा - भारतीय क्रिकेट नियामक मंडळ BCCI - 'नमन पुरस्कार २०२६' या सोहळ्यात - गौरव करणार आहे. आज नवी दिल्ली इथे आयोजित या प्रतिष्ठित सोहळ्यात, यंदा क्रिकेटमधील दिग्गज रॉजर बिन्नी आणि राहुल द्रविड यांना 'कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कार' प्रदान केला जाईल; भारतीय क्रिकेटसाठी केलेल्या असाधारण सेवेबद्दल BCCI कडून दिला जाणारा हा सर्वोच्च सन्मान आहे. दरम्यान, भारतीय महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार मिताली राज हिला, महिला क्रिकेटवर तिने पाडलेल्या उल्लेखनीय प्रभावाच्या सन्मानार्थ, 'BCCI महिला जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित केलं जाईल. जीवनगौरव पुरस्कारांव्यतिरिक्त, 'नमन पुरस्कार' सोहळ्यात २०२४-२५ या क्रिकेट हंगामातील उत्कृष्ट कामगिरीचाही गौरव केला जाणार आहे.

**महिला हॉकी**

एफआयएच महिला हॉकी विश्वकरंडक पात्रता स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघाला काल इंग्लंडकडून ०-२ असा पराभव पत्करावा लागला. मात्र भारतानं विश्वकरंडकासाठी पात्रता सिद्ध केली आहे. इंग्लंडने काल पेनल्टी कॉर्नरवर एक गोल तर ४३ व्या मिनिटाला फील्ड गोल्ड करत दुसरा गोल केला. भारतीय संघाला संपूर्ण साठ मिनिटांत गोल करण्यात अपयश आलं. सामन्यातल्या विजेत्या इंग्लंड संघासह भारत, स्कॉटलंड हे संघ विश्वचषकासाठी पात्र ठरले आहेत.

**हवामान**

दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह वादळ, हलका पाऊस आणि ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची दाट शक्यता आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

**1. 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' स्पर्धेच्या राज्य विजेत्यांसोबत आज पंतप्रधानांचा संवाद**

**2. कोलकाता इथं पंतप्रधानांच्या हस्ते १८ हजार ७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन**

**3. एलपीजीवाहक 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' जहाजं भारताच्या दिशेने मार्गस्थ, एलपीजी सिलिंडर्सची केवळ गरज असेल तर आणि तेव्हाच नोंदणी करण्याचं नागरिकांना आवाहन आणि**

**४. दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे, विजांसह हलक्या पावसाची शक्यता**

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.